MHRT060005692025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६५/२०२५**

**नि.१ वरील आदेश**

**(पारीत दिनांक – १८/०४/२०२६)**

**असलम कासम तळघरकर वगैरे .... अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही. .... सामनेवाला**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रस्तुत कामी अर्जदार यांनी त्यांच्या मुळ अर्जामध्ये अर्जदार यांचे नातेसंबंध नमुद केलेले आहे. अर्जदार यांनी **मयत कासम अहमद तळघरकर व मयत नुरजहॉ कासम तळघरकर** यांचे कायदेशीर वारस असल्याचा दाखला मिळण्याची मागणी या अर्जाद्वारे केली आहे.

३. याकामी अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जात नमुद केल्यानुसार अर्जदार क्र. १ ते ५ चे वडील व अर्जदार क्र.६ ते ८ यांचे आजोबा कासम अहमद तळघरकर हे दि.०८.१०.२०१८ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ ची आई व अर्जदार क्र.६ ते ८ यांची आजी नुरजहॉ कासम तळघरकर ही दि.११.०५.२०१८ रोजी मयत झाली आहे. मयत कासम अहमद तळघरकर व नुरजहॉ कासम तळघरकर यांची मुलगी वहिदा अशरफ चिपळूणकर (पूर्वाश्रमीची वहिदा कासम तळघरकर) ही दि.१३.०८.२०२० रोजी मयत असून तिला अर्जदार क्र.६ ते ८ अशी मुले वारस आहेत. तर त्यांची दुसरी मुलगी तबस्सुम नासिर हुसेन शेख ही देखील मयत असून तिला मुलगा अगर मुलगी असे कायद्यान्वये कोणीही वारस नाहीत. त्यामुळे मयत कासम अहमद तळघरकर व नुरजहॉ कासम तळघरकर यांना अर्जात नमुद केलेप्रमाणे अर्जदार क्र.१ ते ८ हे कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरिक्त मयत कासम अहमद तळघरकर व नुरजहॉ कासम तळघरकर यांना अन्य वारस नाहीत. मयत कासम अहमद तळघरकर व नुरजहॉ कासम तळघरकर यांचे वास्तव्य मौजे खोंडा जोगळे, ता.दापोली जि.रत्नागिरी येथे होते. मयत कासम अहमद

तळघरकर व नुरजहॉ कासम तळघरकर यांच्या पश्चात घर मिळती व जमिन मिळकतींना वारसांची नावे लावण्याकरीता सदर वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी हा प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

**४.** अर्जदार यांनी याकामी अर्जाचे पुष्ट्यर्थ स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. १४ येथे, मयत कासम अहमद तळघरकर यांचा मृत्यु दाखला नि.क्र.१५ येथे, मयत नुरजहॉ कासम तळघरकर यांचा मृत्यु दाखला नि.क्र.१६ येथे, मयत वहिदा अशरफ चिपळूनकर यांचा मृत्यु दाखला नि.क्र.१७ येथे, मयत तबस्सुम नासिर हुसेन शेख यांचा मृत्यु दाखला नि.क्र.१८ येथे, अर्जदार अस्लम कासम तळघरकर यांचा रहवाशी दाखल नि.क्र.१९ येथे, नगराध्यक्षा, नगरपंचायत दापोली यांचा दाखला नि.क्र.२० येथे, पोलीस पाटील, मौजे जोगळे, ता.दापोली यांच्या दाखल्याची सहीसुद प्रत नि.क्र.२१ येथे, अर्जदार क्र.१ यांना अर्जदार क्र.२ ते ८ यांनी दिलेले मुखत्यारपत्र नि.क्र.२२ येथे, अर्जदार क्र.१ यांच्या आधारकार्डच्या छायांकीत प्रती नि.क्र. ५/८ येथे इत्यादी कागदपत्रे हजर केलेली आहेत.

**५.** अर्जदार क्र. १ यांनी नि.क्र.२३ येथे प्रस्तुत अर्जाच्या कामी अधिक पुरावा द्यावयाचा नसल्याची पुरशीस दाखल केलेली आहे.

**६.** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मधील तरतुदी अंतर्गत, मृत्यू पावलेल्या इसमाचे वारस, वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल करु शकतो. असा अर्ज दाखल केल्यानंतर, त्यास कोणाची हरकत असल्याबद्दलचा जाहिरनामा दैनिक वृत्तपत्रामध्ये आणि मयत इसम ज्या ठिकाणी राहतो त्याठिकाणी प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. प्रस्तुत अर्जामध्ये निशाण क्र.१२ येथे दि.०७.११.२०२५ रोजीचे 'दैनिक सागर' वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेली जाहीर नोटिस प्रसिध्द करणेत आलेली आहे. तसेच निशाण क्र.०७ प्रमाणे जाहीरनामा प्रसिध्द करणेत आलेला आहे. त्याच्या प्रती दिवाणी न्यायालय, दापोली यांचे नोटीस बोर्डवर, नगरपंचायत दापोली, ता.दापोली यांचे नोटीस बोर्डवर तसेच मा. तहसिलदार, दापोली यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत. मा. तहसिलदार कार्यालय दापोली यांचे नोटीस बोर्डावर जाहिरनामा प्रसिध्द झाल्याचा अहवाल नि.१३ येथे दाखल आहे. प्रस्तुत अर्जामध्ये सर्व तरतुदींची पुर्तता करण्यात आलेली आहे. अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जास हरकत घेणेसाठी कोणीही न्यायालयाकडे आलेले नाही. तसेच प्रसिद्ध जाहिरनाम्यास व जाहिर नोटीसीस आजतागायत कोणीही कोणतीही हरकत

नोंदविलेली नाही. उपरोक्त परिस्थितीनुसार व कायद्यातील तरतुदींची पहाणी करता अर्जदार क्र. १ ते ८ हे मयत कासम अहमद तळघरकर व नुरजहॉ कासम तळघरकर यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेले आहेत. या परिस्थितीत खालील आदेश पारित करण्यात येतो.

## - <u>आदेश</u> -

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ ते ८ हे मयत **कासम अहमद तळघरकर व नुरजहॉ कासम तळघरकर** यांचे कायदेशीर वारस म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

३. अर्जदार क्र. १ ते ८ यांनी प्रचलित नियमाप्रमाणे आवश्यक मुद्रांक शुल्क भरल्यानंतर त्यांना त्यांचे मागणीप्रमाणे मयत **कासम अहमद तळघरकर व नुरजहॉ कासम तळघरकर** यांचे अर्जदार हे वारस असल्याचा वारस दाखला द्यावा.

**सही/-*****
**(श्रीम. पी. एस. वारके)**
**सह दिवाणी न्यायायाधीश, क. स्तर, दापोली,**
**ता. दापोली, जि.रत्नागिरी.**

**दापोली.**
**दिनांकः- १८/०४/२०२६**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Clerk | : | Shri. R. R. Patil |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., DAPOLI. |
| Date of Order | : | 18/04/2026 |
| Order signed by P.O. on | : | 18/04/2026 |
| Order uploaded on | : | 18/04/2026 |